ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांच्याकरिता खरेदी केलेले लॅपटॉप व प्रिंटर चे उर्वरित देयके अदा करणेकामी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

शासन निर्णय क्रमांक: पूरक-२०२६/प्र.क्र.३३९ (ई-१६७५७०७)/भूमापन

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२

दिनांक : २७ जुलै २०२६

प्रस्तावना :-

DILRMP अंतर्गत अधिकार अभिलेख संगणकीकरण करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांच्याकरीता ८,३०० licenses of MS Office/M३६५ app सह लॅपटॉप व १०,२०० प्रिंटर हे GeM पोर्टलव्दारे खरेदी प्रक्रिया राबवून खरेदी करण्यास महसूल व वन विभाग शासन निर्णय दि.२२.०८.२०२५ व शासन शुद्धिपत्रक दि.२६.०८.२०२५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर लॅपटॉप व प्रिंटरच्या एकूण देयकापैकी रू.३६.५२ कोटी इतक्या रकमेचे देयक जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्वीय प्रपंजी लेखा खात्यातून ३१ मार्च, २०२६ अखेर अदा करण्यात आले आहे. देयकाच्या उर्वरित निधीच्या अदायगीसाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

DILRMP अंतर्गत अधिकार अभिलेख संगणकीकरण करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांच्याकरीता खरेदी केलेल्या ८,३०० licenses of MS Office/M३६५ app सह लॅपटॉप व १०,२०० प्रिंटरच्या उर्वरित देयकाच्या अदायगीसाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात माहे जुन/जुलै, २०२६ च्या अधिवेशनात "मागणी क्र. १ सी, २०२९ जमीन महसूल, १०३(००)(०२) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांची आस्थापना (२०२९०४२२) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षांतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेला रू. रु.४८,२१,०४,०००/- (अक्षरी रू.अठ्ठेचाळीस कोटी एकवीस लक्ष चार हजार मात्र) इतका निधी वितरीत करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी आहरीत करण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर निधी मंजूरी दिलेल्या प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्रस्तुत निधी खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ शासनास सादर करावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौ.सं.क्र.५६९/२०२६/व्यय-१०, दि.१८.०७.२०२६ अन्वये अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेस अनुसरुन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२७१७५२३१६६४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.07.27 17:53:30 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.निवडनस्ती (भूमापन).